# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## जाहिरात

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने व महापालिकेविरुध्द मा. भिवंडी तालुका न्यायालय येथे विविध दावे, दाखल होत असतात. या प्रकरणात महापालिकेची बाजू मांडयाकरिता महापालिकेच्या वकील पॅनलवर २ वकील नियुक्ती करणे करिता खालील नमुद केलेल्या अटी व अर्हता पूर्ण करणा-या इच्छुक वकील उमेदवारांकडून दि. १३/०४/२०२० रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांच्या अर्जात नमुद केलेल्या पत्यावर मुलाखतीची (Walk-in interview) तारीख, वेळ व ठिकाण नंतर अवगत करण्यात येईल.

**भिवंडी तालुका न्यायालयाकरीता वकीलाची अर्हता:-**

१) भिवंडी तालुका न्यायालयातील फौजदारी व दिवाणी दावे हाताळण्याचा किमान ३ वर्षे तालुका न्यायालयाचा अनुभव व ज्ञान असलेला वकील व्यवसायी. भिवंडी शहरातील स्थानिक वकील व्यवसायी यांना प्राधान्य दिले जाईल.

विशेषत: १) महापालिका संबंधीचे कायदे २) महानगरपालिकेची न्यायालयीन प्रकरणे हाताळणेचा अनुभव असलेले अन्य महापालिका वकील पॅनलवर काम केल्याचा अनुभव असलेला ३) विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम-( एल.एल.एम.) शैक्षणीक अहर्ता असलेला वकील व्यवसायी यास प्राधान्य दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांनी अर्जा सोबत व्यवसायीक अनुभवासंबंधी स्व:घोषणा पत्र जोडणे आवश्यक आहे. सदर अर्ज हे पोस्टाने महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील विधी विभागात स्विकारले जातील.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वकील पॅनलवर कोणत्याही उमेदवाराची नियुक्ती करणेचे व नियुक्ती नाकारणेचे अधिकार वा नियुक्त प्रक्रियेत बदल करणेचे सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

सही/-(**XXX**)
**(डॉ. प्रविण आष्टीकर)**
**आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरालिका,**
**भिवंडी.**